# प्रेसनोट

दिनांक– २८/११/२०१८.

## कासा पोलीस स्टेशन, जिल्हा पालघर येथील पोलीस उप निरीक्षकास लाच स्विकारताना अटक

दिनांक २८/११/२०१८ रोजी, कासा पोलीस स्टेशन, जिल्हा पालघर येथील **पोलीस उप निरीक्षक तुषार शालिग्राम भदाने**, वय ३२ व **खाजगी इसम प्रकाश अर्जुन चौधरी**, वय ३२ यांना यातील तक्रारदार यांच्याकडून ७५,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्यावर कासा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २,००,०००/– रुपये देण्याचे ठरले. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन एसीबी, पालघर युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन **लोकसेवक तुषार शालीग्राम भदाने** यांच्यावतीने **खाजगी इसम प्रकाश अर्जुन चौधरी** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणुन ७५,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र वाघमारे, पोलीस निरीक्षक एसीबी, पालघर हे करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ९९६७९१३८९३

तसेच वरील नमुद लोकसेवक यांच्याविरूध्द सन २०१६ सालामध्ये विरार पोलीस स्टेशन येथे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत गुन्हा दाखल झाला होता.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई–मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner